# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात झालेला गैरव्यवहार**

**(१) ८१३४४ (२१-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेमध्ये दिनांक ३१ मार्च २००८ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व काही सामाजिक संघटनांनी पत्र देऊन या कालावधीचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबतची विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी मा.संचालक, स्थानिक निधी व लेखा विभाग, कोकण भवन, मुंबई यांना या महानगरपालिकेचे सदर कालावधीमधील विशेष लेखा परिक्षण करुन त्वरीत शासनास अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे, तसेच विशेष लेखापरिक्षण करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, हा विशेष लेखापरिक्षणाचा अहवाल अद्यापही शासनास सादर न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या अनियमिततेबाबत चौकशी करण्याची तसेच दिनांक ०१/०४/२००६ ते ३१/०३/२०१० पर्यंतच्या कालावधीतील लेख्यांचे विशेष लेखापरिक्षण करण्याची मागणी सामाजिक संघटना, लोकप्रतीनिधी व अन्य नागरीकांकडून करण्यात आली, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे,

अशा प्रकारच्या सूचना स्थानिक निधी लेखा, यांना देण्यात आल्या आहेत.

(३) सन २०११-१२ ते सन २०१३-१४ या तीन आर्थिक वर्षांचे विशेष लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, यांच्याकडून पूर्ण करण्यात आले असून सन २०१४-१५ चे लेखापरिक्षणाची कार्यवाही सुरु आहे, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

• सदर लेखापरिक्षण तातडीने पुर्ण करण्याच्या सूचना संचालक, स्थानिक निधी लेखा यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील " हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रुट" (एचसीएमटीआर) प्रकल्पाबाबत**

**(२) ९६८९१ (३०-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी शहरातील "हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रुट" (एचसीएमटीआर) हा मागील ३० वर्षापासून प्रलंबित असलेल्या वर्तुळाकार रस्त्याच्या प्रकल्पास पुणे महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या शेवटच्या आठवडयात मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे ३६.६ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी बोपोडी,विद्यापीठ चौक,सेनापती बापट रस्ता,पौंड फाटा,कर्वे रस्ता,इ भागाचे भूसंपादन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, (एचसीएमटीआर-हाय कपॅसिटी मास्ट ट्रॅझीस्ट रूट) रस्त्याच्या कामाचा भूसंपादनासाठी पेमेंट किंवा बांधा वापरा हस्तांतरित करा किंवा कर्जरोख उभे करण्याचे अधिकार पुणे महानगरपालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाचे कामासाठी किती खर्च येणार आहे तसेच सदर वर्तुळाकार मार्ग पुणे शहरातील कोणकोणत्या भागातून जाणार असून सदर रस्त्याचा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे,
(५) असल्यास, सदर (एचसीएमटीआर - हाय कपॅसिटी मास्ट ट्रॅझीस्ट रूट) प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • सदर प्रकल्पासाठी तांत्रीक व आर्थिक सल्लागार नेमणे, आर्थिक तरतूद उपलब्ध करणे यासाठी प्रस्ताव सादर करण्यास व आवश्यक प्रशासकीय पूर्तता करण्याचे अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यासाठी पुणे महानरपालिकेच्या मुख्यसभेने दि. २५.९.२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे.
• या रस्त्यासाठी बापोडी, विद्यापीठ चौक, सेनापती बापट मार्ग, पौंड फाटा, कर्वे रस्ता ई. भागापैकी काही भागाचे भूसंपादन करण्यात येणार आहे.

(४) व (५) • या प्रकल्पासाठी अंदाजे खर्च रु. ६,६४६ कोटी एवढा अपेक्षित आहे.

"हाय कॅपेसिटी मास ट्रान्झिट रुट" या मार्गाची आखणी बापोडी, पुणे विद्यापीठ चौक, सेनापती बापट रस्ता, पौंड फाटा, कर्वे रोड, दत्तवाडी, सारसबाग, स्वारगेट, नेहरुरस्ता, लुल्लानगर, वानवडी, रामवाडी, मुंढवा, वडगावशेरी, विमाननगर चौक व विश्रांतवाडी या प्रमाणे आहे.

सदर प्रकल्पास सुमारे ३ वर्षे इतका कालावधी लागणार आहे.

• या प्रकल्पाची आर्थिक सुसाध्यता तपासणीसाठी ट्रान्झक्शन ॲडव्हायजरी कन्सल्टंट नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडा व एमएमआरडीए कॉलनी, जे प्लॉट, विष्णूनगर, वाशीनाका, चेंबूर येथे असलेल्या महानगरपालिकेच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३) १००६६६ (०३-०१-२०१८). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा व एमएमआरडीए कॉलनी, जे प्लॉट, विष्णूनगर, वाशीनाका, चेंबूर येथे असलेल्या महानगरपालिकेच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, महानगरपालिका यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) एमएमआरडीए, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या विविध संस्थांकडून राबविण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये निर्माण झालेल्या प्रकल्पग्रस्त सदनिकांच्या इमारतींचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेस सन २००४-०५ पासून विभाग पातळीवर करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पग्रस्त इमारतींच्या संकुलातील काही इमारती या त्या-त्या प्राधिकरणाच्या प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील ८८ इमारती महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्या आहेत.

सदर ८८ इमारतींमधील १० इमारतींमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्थापना करण्यात आली असून, सदर इमारतींच्या एकवेळ दुरुस्तीसाठी महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, सदर इमारतींच्या दुरुस्तीकरिता महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये पुरेशा निधीची तरतूद करण्यात आली आहे.

उर्वरित ७८ इमारतींमधील प्रकल्पबाधीतांना समुपदेशन देऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी प्रोत्साहीत करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आले आहे. तसेच, सदर कामासाठी महानगरपालिकेमार्फत समाज विकास अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पग्रस्त इमारतींमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात आल्यानंतर, या इमारतींची एकवेळ सर्वकष दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येऊन, सदर इमारती त्या संस्थेस हस्तांतरीत करण्याचे धोरण महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणार आहे.

---

**नागपूर नगरपरिषद वाडी क्षेत्रातील सर्व भुतपुर्व सैनिक यांना मालमत्ता कर माफ करणेबाबत**

**(४) १०१०८४ (०३-०१-२०१८). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर नगरपरिषद वाडी क्षेत्रातील सर्व भुतपुर्व सैनिक यांना मालमत्ता कर (घर टॅक्स) माफ करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडी क्षेत्रातील सर्व भुतपुर्व सैनिकांना मालमत्ता कर (घर टॅक्स) माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) होय.
(२) नगर विकास विभागाच्या दि.०५.०४.२०१६ व ०७.०४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना व माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता करातुन सुट देण्याचे विहीत केले आहे. दि.०९.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अविवाहित शहीद सैनिकांच्या नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करात सुट देण्याचे विहीत केले आहे.

राज्यातील नागरी क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करातुन सुट देण्यासंदर्भात बाब तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खर्डी- टेंभा- वैतरणा (जि.ठाणे) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(५) १०२२०७ (२१-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी- टेंभा-वैतरणा (जि.ठाणे) या रस्त्यावरील खड्डे बुझविण्याकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण होऊनही अद्यापपर्यंत कामास सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त कामास तातडीने सुरुवात करण्याबाबत तसेच विलंबास जबाबदार असणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्ते दुरुस्ती व पुनर्पुष्ठीकरणाचा प्रस्ताव तयार करतांना खर्डी-टेंभा-वैतरणा (जि. ठाणे) या १९ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी खराब अवस्थेतील अंदाजे ९ कि.मी. रस्त्याचे (खर्डी रेल्वे स्टेशन ते बाधेचा पाडा अंदाजे २ कि.मी. व दहीगांव ते टेंभापाडा अंदाजे ७ कि.मी.) दुरुस्ती व पुनर्पुष्ठीकरणाचे काम प्रस्तावित करुन निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक ०१.०१.२०१८ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत खर्डी स्टेशन ते बाधेचा पाडा या २ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच वाहतुक सुरळीत रहावी म्हणून दहीगांव ते टेंभापाडा या दरम्यानच्या रस्त्यावरील मोठया प्रमाणावर नादुरुस्त झालेल्या भागाची दुरुस्ती/पुनर्पुष्ठीकरणाचे काम करण्यात आले असून उर्वरित काम पावसाळयानंतर पुन्हा सुरु करण्यात येणार आहे.

सदर रस्त्याच्या उर्वरित १० कि.मी. रस्त्यापैकी बाधेचा पाडा ते दहीगांव हा ६ कि.मी. लांबीचा रस्ता खराब झाला असून, सदर रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाची निविदा निविदा मार्च २०१८ मध्ये मागविण्यात आली होती. परंतु सदर निविदेस एकदा अपुऱ्या प्रतिसादामुळे व दुसऱ्यांदा शुन्य प्रतिसादामुळे तिसऱ्यांदा निविदा मागविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

दरम्यान या रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने सदर रस्त्यावर असणारे मोठे खड्डे खडी व मातीने तात्पुरत्या स्वरुपात बुजविण्यात आले आहेत. सदर रस्त्याच्या डांबरीकरण व दुरुस्तीचे काम निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात येणार आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील बहुतांश सोसायटीमध्ये ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करणारी यंत्रणा कार्यन्वित नसल्याबाबत

**(६) १०४९८४ (१८-०४-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर),**

**श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुका कचरा-ओला कचरा वर्गीकरण व ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती महानगरपालिकेने बंधनकारक केले असतानाही मुंबईतील केवळ १० टक्के सोसायट्यांनीच महानगरपालिकेची ही सूचना अंमलात आणण्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध कायद्याअंतर्गत महानगरपालिकेच्या वॉर्ड कार्यालयांनी सोसायटी तसेच उपहारगृहांना नोटीसा पाठविल्या नंतरही कुठल्याच प्रकारची दखल घेण्यात आली नसल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २० हजार चौ.मी हून अधिक क्षेत्रफळ असलेल्या सोसायट्यांना कचरा व्यवस्थापन सक्तीचे केले असून ते न केल्यास पर्यावरण संरक्षण कायद्याअंतर्गत वीज व पाणी जोडणी तोडण्याची तरतूद असल्याचे समोर आले आहे, हे ही, खरे आहे काय,

(४) असल्यास, या कायद्यानुसार २० हजार चौ.मी. हून अधिक क्षेत्रफळाच्या किती सोसायट्यांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) घन कचरा व्यवस्थापन नियमावली २०१६ मधील विवक्षित तरतुदींनुसार ५००० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्र असणाऱ्या संस्था व मालमत्तांनी कचऱ्याचे वर्गीकरण उगमस्थानी करावयाचे असून, वर्गीकरण केलेला सुका कचरा हा अधिकृत कचरा वेचक/अधिकृत पुनर्चक्रीकरण केंद्र किंवा महानगरपालिकेला द्यावयाचा आहे.

तसेच ओल्या कचऱ्यावर कंपोस्ट/बोयामिथेनेशन प्रक्रियेद्वारे विल्हेवाट लावावी असे निर्देश महानगरपालिकेमार्फत दिनाक १८.०७.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत.

(२) विविध कायद्यांतर्गत सोसायटी तसेच उपहारगृहांना नोटीसा पाठविल्यानंतर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

अ.मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३६८ अन्वये करण्यात आलेली कारवाई

- ३२३२ संस्थांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.
- वेळ वाढवून देण्याकरिता ५७६ संस्थांनी विनंती केली आहे.
- नोटीशीचे पालन न केलेल्या ११८९ संस्थांवर खटले दाखल करण्यात आले आहेत.
- ९ संस्थांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

ब. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना कायदा कलम ५३(१) अन्वये करण्यात आलेली कारवाई

- ४४७ संस्थांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.
- वेळ वाढवून देण्याकरिता ६६ संस्थांनी विनंती केली आहे.

• नोटीशीचे पालन न केलेल्या ९५ संस्थांवर खटले दाखल करण्यात आले आहेत.

• १६ संस्थांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

क. पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत करण्यात आलेली कारवाई

• २३२ संस्थांना नोटीसा दिल्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला कळविण्यात आले आहे.

• वेळ वाढवून देण्याकरिता ३४ संस्थांनी विनंती केली आहे.

• नोटीशीचे पालन न केलेल्या ३३ संस्थांवर खटले दाखल करण्यात आले आहेत.

• २ संस्थांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्देशाचे पालन न केलेल्या संस्थांवर रु. २,९२,००० इतका दंड आकारण्यात आला आहे.

(३), (४) व (५) २० हजार चौ.मी. हून अधिक क्षेत्रफळ असलेल्या सोसायट्यांना कचरा व्यवस्थापन सक्तीचे करण्यात आले असून, त्यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत परवानगी देण्यात येते.

तथापि, सदर सोसायट्यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमांनुसार कार्यवाही केली असल्यामुळे अद्यापि कारवाई करण्यात आली नसल्याचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

---

**मुंबईतील देवनार स्मशानभूमीत गर्दुल्ल्यांकडून होत असलेल्या सरणाच्या चोरीबाबत**

**(७) १०५०४७ (१२-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार येथील स्मशानभूमीत अमली पदार्थांचे सेवन करण्यासाठी गर्दुले तेथील सरणाची विक्री करत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आता या ठिकाणी सातपैकी केवळ दोन पायर्स सध्या वापरण्यालायक असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त्त प्रकरणी स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यांनी स्थानिक पोलीस स्टेशन व महानगरपालिका अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करूनही याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चोकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सार्वजनिक मालमत्तेची चोरी करणाऱ्या गर्दुल्ल्यांवर कारवाई करण्यास चालढकल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मुंबईतील देवनार स्मशानभूमीमध्ये ६ पायर्स अस्तित्वात आहेत, त्यापैकी ४ पायर्सची झीज झाल्यामुळे अडचण निर्माण होत होती. तथापि, सदर पायर्सची दुरुस्ती करण्यात आली असून, ते वापरण्यात येत आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८) १०५०४८ (१२-०४-२०१८). अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांची बहुतांश पदे ही रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये रस्ते आणि बांधकाम ही कामे पाहणाऱ्या नगर विभागातील कनिष्ठ अभियंत्यांच्या ८०० पैकी तब्बल २५० जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्ते विभागातील रिक्त १६९ जागांपैकी १२५ जागा भरण्याची मागणी मंजूर होऊनही अद्याप ही रिक्त जागा भरण्यात न आल्यचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चोकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार रिक्त अभियंत्यांच्या जागा लवकरात लवकर भरून रस्ते विकास बांधकामांच्या कामाला गती देण्याबाबत शासन महानगरपालिकेला निर्देश देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध आस्थापनांवरील अभियंत्यांच्या पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे : -

| संवर्ग | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता (स्था) | ८४२ | ५७८ | २६४ |
| दुय्यम अभियंता (स्था) | १६६४ | १४२३ | २४१ |

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागात दुय्यम अभियंता (स्थापत्य) संवर्गाची अनुसूचित व अनअनुसूचित अशी एकूण ३२१ पदे असून, त्यापैकी २८३ पदे भरली आहेत व ३८ पदे रिक्त आहेत.

तथापि, प्रमुख अभियंता (रस्ते) यांच्या मागणीनुसार, अभियंत्यांची १६० पदे समायोजन करुन भरण्यास आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

---

### सायन (मुंबई) येथे शौचालय कोसळुन दोन महिला गंभीर जखमी झाल्याबाबत

**(९) १०५१३१ (१८-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईस्थित सायन येथे अचानक शौचालय कोसळल्यामुळे दोन महिला गंभीर जखमी झाल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शौचालय बांधल्यानंतर शौचालयाच्या दुरुस्तीची मागणी होत असतानाही एकदाही शौचालयाची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने केलेली व कारवायाची कारवाई,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१), (२) व (३) दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी सायन येथे सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीचे काम संस्था चालकामार्फत सुरु असतांना दोन महिला शौचालयाच्या सेफ्टीक टाकीमध्ये पाय घसरुन पडल्याने जखमी झाल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.

सदर शौचालय वापराकरिता तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले होते व तसे शौचालयाच्या दर्शनी भागावर फलक लावण्यात आले होते.

तसेच, सदर घटना स्वत:च्या चुकीने झाली असल्याचे सदर महिलांनी संस्था चालकास त्यांच्या लेखी खुलाशाद्वारा कळविले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वरळी येथील गणपतराव कदम मार्ग या रस्त्याच्या रुंदीकरणातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन स्टार गॅरेज जवळील हाऊस फॉर डीसहाऊसच्या भूखंडावर करण्याबाबत

**(१०) १०५१४७ (१४-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील गणपतराव कदम मार्गाच्या दुतर्फा जुन्या खाजगी चाळी (उपकर प्राप्त इमारती) वसलेल्या असून यातील बहुतांश चाळी सद्यस्थितीत जीर्णावस्थेत असून येथील जुन्या चाळी, या चाळीतील रहिवाश्यांची संख्या आणि उपलब्ध जागा याचा विचार करता या चाळींना शेड बँक उपलब्ध नसल्याने येथील रहिवाश्यांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन होवून सद्यस्थितीत प्रचंड वाहतूक कोंडी असलेला हा रस्ता रुंदीकरण होणे अशक्य आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या माध्यमातून या ठिकाणच्या सर्व इमारती म्हाडा कायद्यांतर्गत संपादित करून आणि मुंबई महानगरपालिका आणि म्हाडा यांनी समन्वय साधून या इमारतीतील रहिवाश्यांचे पुनर्वसन याच परिसरातील गणपतराव कदम मार्ग व वीर संताजी लेन दरम्यान असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या स्टार गॅरेज या सुमारे १ एकर क्षेत्र असलेल्या जागेवर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्या दरम्यान लेखी निवेदनान्वये मा. मुख्यमंत्री, यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने वरळी येथील गणपतराव कदम मार्ग या रस्त्याच्या रुंदीकरणावेळी दुतर्फा असलेल्या जुन्या खाजगी चाळीतील रहिवाश्यांचे पुनर्वसन स्टार गॅरेज जवळील हाऊस फॉर डीसहाऊसच्या भूखंडावर करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील कलम ३३(७) अथवा ३३(९) अन्वये सदर चाळींचा पुनर्विकास केल्यास, त्यामध्ये या परिसरातील निवासी आणि अनिवासी रहिवाशांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन होऊन रस्ता रुंदीकरण होऊ शकेल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) अशा स्वरुपाचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाले आहे.

(३) व (४) गणपतराव कदम मार्गाच्या छेद गल्लीतील (वीर संताजी गल्ली) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची स्टार गॅरेज नावाने ओळखली जाणारी ४०५९ चौ.मी. जागा असून, सध्या त्यावर तळमजला + एक मजल्याचे बांधकाम असलेले कर्मचारी निवासस्थानाची इमारत आहे व मोकळया जागेत संपूर्ण शहर विभागातील कर्षण करुन (towed) आणलेली वाहने ठेवली जातात.

सदर जागेचे विकास नियोजन आराखडा २०३४ नुसार विस्थापितांसाठी गृहनिर्माण आणि महापालिकेचा दवाखाना असे आरक्षण आहे.

सदर भूखंडावर पुनर्वसनाकरिता रस्ता रुंदीकरण बाधित निवासी गाळे यांना पर्यायी जागा बांधण्याचे प्रयोजन शक्य आहे. तथापि, अनिवासी बाधित गाळयांना पर्यायी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही.

तसेच, प्रस्तावित रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होऊ शकणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अंदाजे ३५-४० चाळींतील अनिवासी व निवासी भोगवटादारांचे महाराष्ट्र प्रांतिक आणि

नगररचना अधिनियम १९६६ अनुसार कारवाई करुन पुनर्वसन केल्यास कायदेशीर तरतुदीनुसार अपील व दाखल होऊ शकणारे न्यायालयीन खटले यामुळे सदर रस्ता रुंदीकरणास अवास्तव विलंब लागू शकतो.

सदर परिसराचा विकास नियंत्रण नियमावली २०३४ च्या कलम ३३(९) अन्वये पुनर्विकास झाल्यास सदर जीर्ण चाळींचा पुनर्विकास आणि रस्ता रुंदीकरण योग्य प्रकारे होऊन परिसरातील रहिवांशाचे हित चांगल्या प्रकारे जपले जाईल आणि असा समूहपूर्ण पुनर्विकास या परिसराच्या सर्वांगीण विकासाकरिता फलदायी होईल.

---

**काळबादेवी (मुंबई) परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तेथील सुवर्ण कारागिरांनी आपले व्यवसाय अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत**

**(११) १०५१५३ (१९-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळबादेवी परिसरातील नागरिकांच्या अग्नि सुरक्षिततेसाठी तेथील सुवर्ण कारागीरांनी आपले व्यवसाय अन्यत्र स्थलांतरीत करावेत अशा सूचना मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ०२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारागिरांच्या भट्या आणि धुरांच्या चिमण्या यांनी आग लागू नये तसेच वाढते प्रदुषण रोखण्यासाठी त्या परिसरात अग्नि सुरक्षेचीही उपाययोजना नसल्याचे तक्रारदारांनी नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबादेवी व काळबादेवी परिसरातील झवेरी बाजारमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटानंतरही सोन्याचे दागिने घडविणाऱ्या व्यवसायावर कांहीच परिणाम झालेला नव्हता असे असतांनाही मा.मुख्यमंत्री यांनी महानगरपालिकेच्या अधिका-यांना तक्रारींची दखल घेऊन ज्वेलर्सची दुकाने हटविण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक सुवर्ण कारागिरांनी अन्यत्र व्यवसाय स्थलांतरीत करण्यासंदर्भात विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर दुकानदारांना मुंबईत इतरत्र स्थलांतरीत करुन इतरत्र जागा देण्यात येणार आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१), (२) व (३) काळबादेवी भागात "घराच्या शेजारी रसायनाचा वापर व अवैध चिमणी लावल्याबाबत" या विषयाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजीच्या मंत्रालय लोकशाही दिनामध्ये सुनावणी घेण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे.

सदर लोकशाही दिनाच्या सुनावणीवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत :-

• सदर रहिवासी भागात सुवर्णकार कारागीर व्यावसायिकांच्या असलेल्या अनधिकृत चिमण्या व अवैध रसायनांचा वापर बंद करण्यासंदर्भात गैरवापरकर्त्यांना अवैध कारखाने बंद करण्याची नियमानुसार कालावधी नमूद करुन नोटीस द्यावी.

• या प्रकरणी या भागातील सुवर्णकार कारागीरांना त्यांच्या व्यवसायाकरिता पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्तांनी संबंधितांबरोबर बैठक घेऊन त्याचा अहवाल सादर करावा.

(४) व (५) यानुषंगाने शासन स्तरावर बैठक नियोजित आहे.

---

## पुण्यामध्ये नव्याने समाविष्ट गावांमधील कामांच्या नियोजनाकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(१२) १०५१९८ (१२-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यामध्ये नव्याने समाविष्ट गावांमधील कामांच्या नियोजनाकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून कचरा, सांडपाणी व्यवस्थापन होत नसल्याने नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने समाविष्ट गावांमधील नागरी समस्यांमध्ये दिवसैंदिवस वाढ होत असून कचरा नियमितपणे उचलला जात नाही, रस्ते स्वच्छ केले जात नाहीत, सांडपाण्याचे व्यवस्थापन नसल्यामुळे ते उघड्यावरूनच वाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असतांना महानगरपालिका प्रशासनाकडून काहीच कार्यवाही होत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाविष्ट गावांमधील कामांच्या नियोजनाकडे महानगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे विसर्जीत ग्रामपंचायतींच्या (शिवणे, उत्तमनगर, धायरी व इतर) माजी पदाधिका-यांकडून निवेदन मा.मुख्यमंत्री यांना देण्यात आले असून नागरी सुविधा देण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्याने समाविष्ट गावांमधील कामांच्या नियोजनाच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई होत नसतांना शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • दि.४.१०.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे पुणे महानगरपालिकेत नव्याने फुरुसुंगीसह ११ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.

• सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या संबंधीत ११ गावांसाठी सदर आर्थिक वर्षात तरतूद उपलब्ध नसल्याने मोठी विकासकामे हाती घेता आली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

• तथापि, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी पुणे महानगरपालिकेने नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी वर्गीकरणाव्दारे आवश्यक निधी उपलब्ध केला आहे. त्यामधून या गावातील देखभाल दुरुस्ती, विद्युत देयके अदायगी अशी कामे करण्यात आली आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तरतूद करण्यात आली आहे.

• सदर निधीतून रस्ते, पायाभूत सुविधा, घनकचरा व्यवस्थापन, जलशुध्दीकरण यंत्रणा, सांडपाणी व्यवस्थापन विषयक कामे, आरोग्य व इतर अनुषंगीक विकास कामे करण्याचे प्रस्तावित आहे. पथ विभागामार्फत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये समाविष्ट नविन प्रत्येक गावांतील रस्ते विकसनासाठी रक्कम रु. १७३ लक्षची तरतूद उपलब्ध करण्यात आलेली असून टेंडर प्रक्रिया कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अनधिकृत हॉटेल व उपहारगृहांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) १०५२०५ (०३-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अनधिकृत हॉटेल व उपहारगृहे यांच्यावर नोटीसा बजावून कारवाई करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेने टेरेस व पार्किंग मधील किती व कोणत्या हॉटेल व उपहारगृहांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय.

(२) नाशिक महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत टेरेस व पार्किंग/बेसमेंटमध्ये ५६ अनधिकृत हॉटेलचा वापर आढळून आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणेकामी महानगरपालिकेमार्फत संबंधितांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेंतर्गत बेस्ट उपक्रमातून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना ग्रॅच्युइटी व इतर निवृत्ती लाभ मिळाला नसल्याबाबत**

**(१४) १०५७७० (१२-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेंतर्गत बेस्ट उपक्रमामार्फत माहे नोव्हेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१८ पर्यंत बेस्ट उपक्रमातून निवृत्त झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना ग्रॅच्युइटी व इतर निवृत्ती लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सुमारे १५०० निवृत्त कर्मचारी / अधिकारी असून त्यांची थकीत रक्कम अंदाजे १ कोटी ७५ लाख असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही निवृत्त कर्मचारी न्यायालयात देखील गेले असून त्यांना १० टक्के पेनल्टी चार्जेस लावून निवृत्ती लाभ द्यावा असे न्यायालयाने निर्देश दिल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत ग्रॅच्युइटी व इतर निवृत्ती लाभ न मिळण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर ग्रॅच्युइटी व इतर निवृत्ती लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) बेस्ट उपक्रमातून माहे नोव्हेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत ३०५५ अधिकारी/कर्मचारी निवृत्त झाले असून, त्यांची थकीत रक्कम अंदाजे रु. २५३.४५ कोटी इतकी आहे.

(३) हे खरे आहे.

तथापि, सदर प्रकरणी मा. औद्योगिक न्यायालयाच्या आदेशाविरुध्द बेस्ट उपक्रमाने मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) बेस्ट उपक्रमाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे कर्मचाऱ्यांच्या ग्रॅच्यइटी व इतर निवृत्ती लाभ इत्यादी देयकांचे प्रदान करणे शक्य झाले नाही.

(५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्देशानुसार बेस्ट उपक्रमाची आर्थिक तूट कमी करण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

---

**मुंबई शहर व उपनगरातील मागील पाच वर्षामध्ये महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्येमध्ये घट झाल्याबाबत**

**(१५) १०६४२४ (१८-०४-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण**

**(कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील मागील पाच वर्षामध्ये महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या ४,३४,५२३ वरुन सन २०१६-१७ मध्ये ३,४३,६२१ एवढ्यावर आलेली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थीची संख्या वाढविण्याबाबत तसेच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या कमी झाल्याबाबतचा अहवाल प्रजा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेचा अहवाल माहे डिसेंबर २०१७ मध्ये प्रसिध्द झाला होता ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई पब्लिक स्कुल ही संकल्पना राबविल्यामुळे विद्यार्थ्यांचा तसेच शाळांचा दर्जा वाढलेला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी व विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• मोफत पाठयपुस्तके, २७ शालोपयोगी वस्तू, मध्यान्ह भोजन तसेच इ. ८ वी पासून विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण केले जाते.

• व्हर्च्युअल क्लासरुमच्या माध्यमातून शैक्षणिक तासिकांचे आयोजन करुन विशेष मार्गदर्शन केले जाते.

• ज्ञानरचना वादावर आधारीत शैक्षणिक कामकाज व्हावे यासाठी विविध कार्यशाळांचे, प्रशिक्षणांचे, मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले जाते.

• इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गांना हस्तकला, चित्रकला व संगीत शिकविण्यासाठी तज्ञ शिक्षक उपलब्ध आहेत.

• शाळा सुधार प्रकल्पांतर्गत ५८ द्विभाषिक शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून माध्यमाच्या भाषेबरोबर प्रथम भाषा इंग्रजी शिकविण्यात येते.

• महानगरपालिकेच्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व विभाग निरीक्षक यांना इंग्रजीवर प्रभुत्व येण्यासाठी ब्रिटीश काऊन्सिलमार्फत विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे.

• माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग शिबिरांचे आयोजन केले जाते.

• गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते.

• प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना गणित, ऑलिम्पियाड, विज्ञान ऑलिम्पियाड, इंग्रजी ऑलिम्पियाड, प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच अन्य आंतरराष्ट्रीय परीक्षांना बसता यावे यासाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक तयारी करुन घेण्यासाठी अभ्यासक्रम व परीक्षांचे नियोजन केले आहे.

• महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये संगणक प्रशिक्षण दिले जाते.

• इयत्ता १ ली ते ५ वी मधील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचे सेवांतर्गत प्रात्यक्षिकांसह विशेष प्रशिक्षण दिले जाते.

• विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात रुची निर्माण व्हावी यासाठी मिनी सायन्स लॅबची निर्मिती करण्यात आली आहे.

• शिक्षण क्षेत्रामध्ये नव्याने होत असलेल्या सकारात्मक आधुनिक बदलांची जाणीवजागृती करण्यासाठी प्रशिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते.

• शाळांमध्ये चालणाऱ्या शैक्षणिक कामकाजाची माहिती करुन घेण्यासाठी व आवश्यकतेनुसार योग्य व समर्पक मार्गदर्शन करण्यासाठी महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांपासून ते विभाग निरीक्षक (शाळा) पर्यंत सर्व अधिकारी वर्ग शाळा भेटी देत असतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सी वॉर्डातील जमुना या इमारतीच्या टेरेसवर अवैध बांधकाम करुन बेकायदेशीर गर्ल्स हॉस्टेल चालविले जात असल्याबाबत

**(१६) १०७२८६ (१२-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका मुख्य कार्यालय तसेच पोलीस आयुक्तालयापासून हाकेच्या अंतरावरील एलटी मार्गावरील, सी वॉर्डातील जमुना या इमारतीच्या टेरेसवर अवैध बांधकाम करुन बेकायदेशीर गर्ल्स हॉस्टेल मागील पाच वर्षापासून चालविले जात असल्याबाबत पालिका व पोलीस यांचेकडे नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही या बेकायदेशीर गर्ल्स हॉस्टेल विरोधात तसेच बांधकामाविरोधात कोणतीच कारवाई महानगरपालिकेच्या सी वॉर्डाच्या सहाय्यक आयुक्तांनी केली नसल्याची बाब दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका वृत्तपत्राच्या वार्ताहराने दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी स्टिंग ऑपरेशन केलेल्या घटनेची छायाचित्रांसह बातमी प्रसिध्द करुनही संबंधित अवैध गर्ल्स हॉस्टेलवर कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अवैध बांधकाम करुन निर्माण करण्यात आलेल्या १८ खोल्या, यामध्ये राहणाऱ्या व्यक्तींकडून दरमहा १५ हजार रुपये वसुल करण्यात येणारे भाडे, अशा स्वरुपाच्या

सी वॉर्डातील अनेक ठिकाणी सुरु असलेली गर्ल्स हॉस्टेल या सर्वाविरुध्द अनेक तक्रारी येऊनही सी वॉर्डाच्या सहाय्यक आयुक्तांनी या तक्रारींकडे हेतूत: दुर्लक्ष केल्याने सी वॉर्डात बेकायदेशीररित्या गर्ल्स हॉस्टेल तयार करुन जागा मालकांनी कोटयवधी रुपये कमविले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असंख्य तक्रारी येऊनही कोणतीही कारवाई न करणाऱ्या सी वॉर्डाच्या सहाय्यक आयुक्तांविरोधात महानगरपालिका आयुक्तांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १०.०७.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०.१२.२०१७ रोजी स्थळनिरीक्षण करण्यात आले असता, जमुना इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील टेरेसवर ५ खोल्या बांधण्यात आल्या असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले.

त्यानुसार सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.०१.२०१८ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून, सदर अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत दिनांक १३.०३.२०१८ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले आहेत.

तथापि, सदर नोटीस व अंतिम आदेशास पक्षकाराने क्रमांक ८४४/२०१८ अन्वये दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर प्रकरणी मा. दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३), (४) व (५) सदर इमारतीत दिनांक २३.०५.२०१८ रोजी महानगरपालिकेमार्फत केलेल्या पाहणीत खालीलप्रमाणे बाबी आढळून आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे:-

- सदर ठिकाणी लॉजिंगचा व्यवसाय चालत नसल्याचे आढळून आले.
- सदर ठिकाणच्या खोल्या ६ महिने ते १ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर दिल्या आहेत.
- सदर खोल्या दैनंदिन तत्वावर दिल्या जात नाहीत.
- तेथे मुलींचे हॉस्टेल असल्याचा बोर्ड, हॉस्टेलचे नाव दिलेले नसून, सेवेसाठी कोणतेही कर्मचारी नेमलेले नाहीत.
- प्रत्येक खोलीला स्वतंत्र इलेक्ट्रीक मीटर असून ते भाडेकरु भरतात.

---

## मुंबई उपनगरातील भांडूप (प.) येथील महानगरपालिकेच्या एस विभागातील अनधिकृत बांधकामांबाबत

**(१७) १०७८९६ (१८-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील भांडूप (प.) येथील महानगरपालिकेच्या एस विभागातील अनधिकृत बांधकामांबाबत अनेक तक्रारी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींकडून एस विभागातील सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) यांच्याकडे करुनही कारवाई होत नसल्यामुळे या अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई व्हावी यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रार निवेदने देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रार निवेदनात सदर अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्याऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या एस विभागातील अधिका-यांवर कारवाई करावी व अनधिकृत बांधकामे निष्कासित करावी अशीही मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, तक्रार निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकांना संरक्षण देणा-या अधिका-यांवर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याच्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) व (२) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक १२.०१.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांसंबंधी प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत स्थळनिरीक्षण करण्यात येते व अनधिकृत बांधकाम सुरु असल्यास किंवा अनियमितता आढळून आल्यास सदर अनधिकृत बांधकामांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कारवाई करण्यात येते.

त्यामुळे सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाकडून विकास कामांसाठी मिळालेला अनुदान निधी नागपूर महानगरपालिकेच्या वित्त विभागाने त्याच कामावर खर्च न करता इतर कामांवर खर्च केला असल्याबाबत

**(१८) १०७९६९ (१८-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून विकास कामांसाठी मिळालेला अनुदान निधी नागपूर महानगरपालिकेच्या वित्त विभागाने त्याच कामावर खर्च न करता इतर कामांवर खर्च केला असल्यामुळे कंत्राटदारांची ५० कोटींची बिले प्रलंबित असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास समोर आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नागपूर शहरातील विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकरणी कंत्राटदारांनी विचारणा केली असता वित्त अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी शासन अनुदानाची रक्कम अन्य प्रयोजनासाठी खर्च केल्याचे प्रथमदर्शनी आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार दिसून येत असल्याने, याबाबत आवश्यक तपासणी करुन, संबंधीत जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबत आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना निदेश दिले आहेत.

---

**ठाणे शहरातील जवळपास ३१४ एकर जागेवरील मालमत्ता वादात अडकल्याबाबत**

**(१९) १०९०८६ (१२-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील नागरिकीकरण दुप्पटीने वाढले असून मात्र शहरातील जवळपास ३१४ एकर जागेवरील मालमत्ता वादात अडकल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी मालकीची जागा आता केंद्र शासनाच्या मालकीची असली तरी यातील बहुतांशी जमिनींवर खाजगी विकसकाने विकास कामे व अतिक्रमण केले असल्याने या जमिनीवर झालेल्या मालमत्तांची मालकी वादात सापडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जागांची देखभाल The Provident Investment co.Ltd या मध्यप्रदेश शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे, कंपनीच्या वतीने जे अधिकारी या मालमत्तेची देखभाल करत होते त्यांच्याकडे सर्व मालमत्तांची यादी होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) प्रोव्हीडेन्ट इनव्हेस्टमेंट कंपनी लि., ही मध्य प्रदेश सरकारची अंगीकृत कंपनी असुन मुंबई व ठाणे येथील काही मालमत्तांची उक्त कंपनीमार्फत देखभाल करण्यात येत असल्याचे तसेच केंद्र शासनाने उक्त सर्व मालमत्तांची

यादी मध्य प्रदेश सरकारकडे मागितली असुन याप्रकरणी केंद्र शासन स्तरावर प्रकरण सुरु असल्याने या मालमत्तांसंदर्भात हक्क हस्तांतरण, इ. कोणतेही व्यवहार करण्यात येऊ नयेत अशी विनंती सचिव, वित्त विभाग, मध्य प्रदेश शासन यांनी केली व त्यानुषंगाने सचिव, वित्त विभाग, मध्य प्रदेश यांचेकडून प्राप्त यादीतील तसेच प्रोव्हीडेन्ट इनव्हेस्टमेंट कंपनी लि. यांच्या देखभालीतील कोणत्याही मालमत्तेसंदर्भात विकास परवानगी दुरुस्ती, हक्क हस्तांतरण, इ. प्रस्तावास मान्यता देऊ नये, अशा सूचना ठाणे महानगरपालिका यांना दिनांक १५.११.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.३६/१९६३ प्रलंबित असल्याचे व केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत तपास सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील व्यापा-यांनी जकात कराचे सुमारे ६६८ कोटी रुपये थकित ठेऊन मुंबई महानगरपालिकेची आर्थिक फसवूणक केल्याबाबत

**(२०) १०९६५१ (१२-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये सन १९९२ पासून १ लाखाहून अधिक प्रकरणात व्यापा-यांनी प्रत्यक्षात माल निर्यात न करताच मुंबईतच विक्री करुन एन प्रपत्रांतर्गत भरुन व जकातीत सुट मिळवून जकात कराचे सुमारे ६६८ कोटी रुपये थकित ठेऊन मुंबई महानगरपालिकेची आर्थिक फसवूणक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी जकात कर थकवून महानगरपालिकेची फसवणूक करणा-या व्यापा-यांचा शोध घेऊन जकात कर वसूल करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी व्यापाऱ्यांविरुध्द पोलीसात तक्रार दाखल करुन त्यांना अटक करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) मुंबईत आयात होणारा माल तात्काळ निर्यातीच्या हेतूने, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १९४(अ) व जकात नियमावली १९६५ अन्वये “एन” प्रपत्रांतर्गत जकातीतून सूट मिळण्यास पात्र आहे.

सदर सूट खालील अटींसापेक्ष दिली जाते:-

- सदर माल आयातीच्या दिनांकापासून १६८ तासांत मुंबई बाहेर जाणे आवश्यक आहे.
- निर्यात कार्यकेंद्राच्या ठिकाणी कार्यरत महानगरपालिका कर्मचाऱ्यांकडून निर्यातीचा दाखला घेणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे दखल न घेतल्यास “एन” प्रपत्र अप्रमाणित होते. सदर माल मुंबईत वापरला असे समजून मागणीपत्र पाठविण्यात येते.

"एन" प्रपत्रांतर्गत आयात केलेला माल विहित कालावधीत निर्यात केल्याचा समाधानकारक पुरावा सक्षम अधिकाऱ्यांना सादर केल्यास पडताळणी शुल्क आकारुन "एन" प्रपत्र मागणीपत्र बंद केले जाते अथवा अंतर्भूत जकातीची रक्कम वसुल केली जाते.

जकात वसुली प्रकरणी सन १९९२ पासून आतापर्यंत रु. २४७.४० कोटी अंतर्भूत असलेली २१,६९७ प्रकरणे बंद करण्यात आली असून, उर्वरित ६६५ कोटी अंतर्भूत असलेल्या १,००,९८० प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) सदर प्रलंबित "एन" प्रपत्र मागणीपत्रे बंद करण्याकरिता व्यापाऱ्यांना स्मरणपत्रे पाठविणे तसेच, मुंबईस्थित व्यापाऱ्यांच्या कार्यालयांना भेटी देऊन "एन" प्रपत्र मागणीपत्र बंद करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सन १९९२ ते सन २०११ पर्यंत ९०% प्रपत्र मागणीपत्रे बंद करण्यात आली आहेत.

(३) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत कसूरदाराविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ तसेच जकात नियमावली १९६५ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे नगरोत्थान योजनेतून व तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातून शहरातील तीन प्रमुख रस्त्यांची कामे सुरू असल्याबाबत

**(२१) १०९७९७ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील नगरोत्थान योजनेतून आठ तर तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातून पंढरपूर शहरातील तीन प्रमुख रस्त्यांची कामे सुरू असून यामध्ये नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या विलंबामुळे कामे प्रलंबित असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर शहरातील विविध रस्त्यांची कामे अपूर्ण असल्यामुळे संपूर्ण शहरामध्ये धुळीचे साम्राज्य असून स्थानिक नागरिकांना व भाविकांना या रस्त्यावरून जातांना कसरत करावी लागत असल्याचेही आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर शहरातील विविध योजनेतून साकारण्यात येणाऱ्या रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण होणेबाबत संबंधित नगरपालिका प्रशासन व संबंधित बांधकाम विभाग हे कोणत्या उपाययोजना करणार वा करित आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • पंढरपूर शहरात तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३ रस्त्यांची रुंदीकरण व डांबरीकरणाची कामे सुरु असून, सदर रस्ते वाहतूकीसाठी खुले आहेत.

• महाराष्ट्र राज्य सुवर्णजंयती नगरोत्थान राज्यस्तर योजनेअंतर्गत ८ रस्त्यांची कामे मंजूर आहेत. यापैकी ५ रस्त्यांची कामे नगरपरिषदेमार्फत सुरु असून, या रस्त्यापैकी ४ रस्ते

वाहतुकीसाठी खुले आहेत. २ रस्त्यांच्या कामांमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने तांत्रिक मंजूरी घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

• या रस्त्यांची कामे सुरु असतांना नागरिकांना होणाऱ्या असुविधेबाबत नगरपरिषदेच्या स्तरावर वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत असल्याचे नगरपरिषद, पंढरपूर यांनी कळविले आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने थकबाकी वसूलीसाठी सुरु केलेल्या अभय योजनेबाबत**

**(२२) ११०१८० (०३-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने थकबाकी वसूलीसाठी सुरु केलेल्या अभय योजनेला प्रतिसाद न देणा-या थकबाकीदारांच्या मालमत्त्तांवर जप्ती आणून वसूली करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्तांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत किती थकबाकीदारांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कर न भरणाऱ्या कसुरदारांविरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील तरतुदीनुसार मिळकतीची जप्ती/अटकावणी करणे, लिलावाद्वारे विक्री करणे, मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे इत्यादी प्रकारची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

(३) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कर न भरणाऱ्या १९ कसुरदारांच्या मालमत्ता महानगरपालिकेमार्फत ताब्यात घेण्यात आल्या असून, सदर मिळकतींवर महानगरपालिकेचे फलक लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडूप (प.) क्षेत्रातील अनेक विभागातील हजाराहून अधिक घरे, छोटे-मोठे व्यवसायीक दुकाने, रुग्णालये इत्यादी नाला रुंदीकरणाच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे बाधीत होणार असल्याबाबत**

**(२३) ११०७८२ (१८-०४-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील भांडूप (प.) क्षेत्रातील महाराष्ट्रनगर, कोकणनगर, उत्कर्षनगर, साईहील, साईविहार यासह अनेक विभागातील हजाराहून अधिक घरे, छोटे-मोठे व्यवसायीक दुकाने, रुग्णालय इत्यादी नाला रुंदीकरणाच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे बाधीत होणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाला रुंदीकरणामुळे बाधित होणा-या येथील नागरीकांचे, व्यावसायीक गाळे धारकांचे, उद्योगधंद्यांचे व रुग्णालयांचे पुनर्वसन कोठे करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे बाधित होणा-यांचे तेथील विभागातच पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे व आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) मुंबई उपनगरातील भांडूप (प.) क्षेत्रातील वैभव नगर नाला रुंदीकरण प्रकल्पामुळे एकूण ९९२ गाळे व झोपडीधारक बाधीत होणार आहेत.
(२) सदर बाधीत होणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनाबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ब्रिमस्टोवॅड प्रकल्प धोरणांतर्गत कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## राजूरा (जि.चंद्रपूर) नगरपरिषदेस थकित निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२४) ११०८७७ (१९-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) नगरपरिषदेची नागरी दलितवस्ती सुधारणा योजना सन २०१३-१४ या वर्षाची ४८ लक्ष ५६ हजार, वैशिष्ट पुर्ण विशेष निधी सन २०१३-१४ या वर्षाची ६१ लक्ष ७४ हजार, नगरोत्थन अनुदान २०१४-१५ या वर्षाची १ कोटी ३२ लक्ष २२ हजार, वैशिष्ट पुर्ण विशेष निधी सन २०१४-१५ या वर्षाची ९५ लक्ष ४१ हजार ही अखर्चीत रक्कम शासनाकडे थकीत असून सदर रक्कम मिळण्याकरीता राजूरा नगरपरिषदेनी वेळोवेळी मागणी केली असतांनासुध्दा अद्यापही सदर थकीत रक्कम देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनीसुध्दा सह सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांना दिनांक १२ जून, २०१७ रोजी पत्र पाठवून कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर थकीत रक्कम किती दिवसात उपलब्ध करून देण्यात येणार आहे,
तसेच सदर रक्कम तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत वित्तीय वर्ष सन २०१३-१४ या वर्षातील ४८.५६ लाख, वैशिष्टयपूर्ण योजने अंतर्गत वित्तीय वर्ष सन २०१३-१४ मध्ये वितरीत केलेल्या निधी पैकी रु.६१.७४ लाख, सन २०१४-१५ मधील वितरीत निधी पैकी रु. ९५.४१ लाख इतका अखर्चीत निधी असुन सदर निधी राजुरा नगरपरिषदेकडे शिल्लक आहे. शासनाकडे थकित रक्कम देणे नाही. नगरोत्थान योतनेअंतर्गत राजूरा नगरपरिषदेसाठी राज्यस्तरीय योजनेतून कोणतेही अनुदान देण्याची बाब प्रलंबित नाही.

दिनांक १२ मार्च,२०१८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही अपेक्षित आहे.
(३) शासनाकडे थकित रक्कम नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे परिसरात लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा नागरी सुविधा पुरविण्याबाबत

**(२५) १११४१२ (१२-०४-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे परिसरात शिक्षण आणि रोजगाराच्या संधीमुळे मोठया प्रमाणात विकास व विस्तार होत असताना मात्र वाढत्या लोकसंख्येला पुरेशा नागरी सुविधा पुरविण्यास सर्वच यंत्रणा कमी पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने येथील नागरीकांना पुरेशा नागरी सुविधा पुरविण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यासोबतच येथील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१८) :** (१) व (२) • पुणे शहराच्या परीसरामध्ये मोठ्या प्रमाणावर विकास व विस्तार होत असून लोकसंख्या वाढत आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि पुणे महानगरपालिकेची वाढती हद्द व लोकसंख्या विचारात घेता पुणे शहरासाठी २४ x ७ पाणीपुरवठा करणेसाठी योजना हाती घेण्यात आली आहे.

• तसेच पुणे महानगरपालिकेमार्फत विकास योजनेतील ताब्यात आलेल्या रस्त्यांचे तातडीने विकसन करण्याचे काम करण्यात येत आहे. तसेच रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे देखील नियमीत करण्यात येत आहेत.

• आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी उड्डाणपूल, रस्ते, भूयारी मार्ग, नदीवरील पुल व बीआरटी मार्ग विकसीत केले आहेत.

• साथीच्या आजारावर प्रतिबंधात्मक व उपचारात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील रस्त्यांवर होणा-या अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याबाबत**

**(२६) ११२२४२ (१२-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्त्यांवर होणा-या अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक कोंडीत सापडलेल्या परिवहन विभागाच्या बेस्ट बसेसही अपघातात अव्वल असल्याचेही सन २०१६-१७ या वर्षातील आकडेवारीवरून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्ट बसच्या अपघातात २१ जणांना आपले प्राण गमवावे लागले असून ३८३ जण जखमी होऊन काही जणांना कायमचे अपंगत्व आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर अपघात होऊ नयेत यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१), (२) व (३) सन २०१६-१७ मध्ये बेस्ट बसच्या अपघातात एकूण २२ जणांना प्राण गमवावे लागले असून, २६५ जण जखमी झाले आहेत.

तसेच सन २०१७-१८ मध्ये एकूण २१ जणांना प्राण गमवावे लागले असून, १३० जण जखमी झाले आहेत.

(४) बेस्ट बसगाडयांमुळे होणाऱ्या प्रत्येक अपघाताची बेस्ट प्रशासनामार्फत खातेनिहाय चौकशी करण्यात येत असून, चौकशीत दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर सेवाविनियमानुसार कारवाई करण्यात येते.

अपघात घडू नयेत याकरिता बसचालकांना बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल करुन घेतांना सुरक्षित बसचालकाकरिता आवश्यक असलेले प्रशिक्षण पुरेशा कालावधीकरिता देण्यात येते.

तसेच, बस उपक्रमाच्या सेवेतील बसचालकांना ठराविक कालावधीने समुपदेशन आणि प्रशिक्षण सातत्याने देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुलाबा (मुंबई) येथील झोपडपट्यांमध्ये सुमारे ६० हजाराहुन अधिक लोकवस्ती असलेल्या परिसरात नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याबाबत**

**(२७) ११२३६८ (१२-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील १३ हुन अधिक झोपडपट्यांमध्ये सुमारे ६० हजाराहुन अधिक लोकवस्ती असलेल्या परिसरात नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याची बाब माहे जुन, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी जुन्या जलवाहिन्या व पाण्याच्या टाक्या दुरुस्ती तसेच झोपडपट्यामध्ये ठिकठिकाणी जलसाठा अंतर्गत पाण्याच्या टाक्या बांधून देण्याबाबतची मागणी नागरिकांकडून सतत होत असल्याची बाब निदर्शनास आली व त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अर्थसंकल्पामध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत पाण्याचा व्यापार करित असलेल्या टँकर माफिया यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी शोषण टाक्यांबाबत कोणताही अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(३) सदर परिसरात टँकर माफिया नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(४) कुलाबा प्रभागातील झोपडपट्टी परिसरास पाणी पुरवठा करणाऱ्या ६०० मिमी. व्यासाच्या जलवाहिनीवरील भूमिगत गळत्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दुरुस्त करण्यात आल्या असून, त्या परिसरातील जलप्रवाहात वाढ झाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा असलेल्या दादर, भुलेश्वर व इतर ठिकाणचे कबुतर खाने बंद करण्याबाबत**

**(२८) ११२३७५ (१२-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा असलेल्या दादर, भुलेश्वर व इतर ठिकाणचे कबुतर खाने बंद करण्याची मागणी होत असल्याचे माहे जून,२०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कबुतर खान्यामुळे परिसरात कबुतरामुळे आजार पसरत असल्यास वा शारिरीक नुकसान होत असल्याच्या तक्रारी येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तंज्ञांमार्फत समिती नेमून शासन अहवाल सादर करणार आहे,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुलाबा (मुंबई) येथील ठाकूरद्‌वार गिरगाव स्थित फणसवाडी येथील शगुन डेव्हलपर्स विकासकामार्फत सुरु असलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत**

**(२९) ११२३७७ (१२-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा (मुंबई) येथील ठाकूरद्‌वार गिरगाव स्थित फणसवाडी येथील शगुन डेव्हलपर्स या विकासकामार्फत कापरेश्वर मार्ग येथील रहिवासी इमारत मागील ४ ते ५ वर्षापासून पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुर्नविकासाबाबतचे काम सद्या बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील रहिवासी धोकादायक इमारतीत राहत असल्याने सदर इमारत कोसळण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) व (२) भुलेश्वर डिव्हीजन येथील भूकर क्रमांक २२५५ येथील इमारतीच्या पुनर्विकासाबाबत महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०.०८.२०१२ रोजी अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी.) देण्यात आली असून, आरंभ प्रमाणपत्र दिनांक २८.०५.२०१५ रोजी देण्यात आले आहे.
(३), (४) व (५) सदर भूकर क्रमांक २२५५ वरील सर्व जुन्या इमारती रिक्त करुन निष्कासित करण्यात आल्या आहेत.

विकासकाने सदर भूखंडासोबत १७ भूभाग एकत्रित करुन विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अन्वये समूह पुनर्विकास प्रस्ताव उच्च स्तरीय समितीची मान्यता मिळण्याकरिता सादर केला आहे.

---

## गोकुलदास तेजपाल शासकीय रुग्णालयात (जी.टी. हॉस्पीटल) महानगरपालिकेमार्फत पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याबाबत

**(३०) ११२४२२ (१२-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुलदास तेजपाल शासकीय रुग्णालयात (जी.टी. हॉस्पीटल) मागील ५-६ महिने महानगरपालिकेमार्फत पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने कर्मचारी व रुग्णांना त्रास होणे, नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने रुग्णालयातील शस्त्रक्रिया रद्द करावी लागणे तसेच रुग्णांचे व त्यांच्या नातेवाईकांचे हाल होत असल्याबाबत पत्रव्यवहार करुनसुध्दा अद्याप कार्यवाही न झाल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कुलाबा) मा. पालकमंत्री, मुंबई शहर यांना दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस निवेदन प्राप्त झाले नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) गोकुळदास तेजपाल शासकीय रुग्णालयास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांच्या गरजेनुसार १ लाख ७० हजार लिटर एवढा पुरेसा पाणी पुरवठा होत आहे.

तथापि, सदर रुग्णालयाचा अंतर्गत विस्तार व रुग्णांची संख्या वाढल्यामुळे सद्य:स्थितीत असलेला पाणी पुरवठा अपुरा पडत असल्याचे प्रतिपादन सदर रुग्णालयाच्या अधिक्षकांनी केल्यामुळे, तेथे अस्तित्वात असलेल्या जलवाहिनीचा व्यास वाढविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याबाबत रुग्णालयाच्या अधिक्षकांस दिनांक १९.०४.२०१८ रोजी पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी गोकुळदास तेजपाल रुग्णालयामार्फत ऑनलाईन अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेस अद्यापि प्राप्त झालेला नाही.

---

## डी. वाय. पाटील संस्थेतील सुमारे १५० कामगारांना बनावट रुग्ण म्हणून हातांवर बँडेज लावून उपचार सुरू असल्याचे भासविण्यात आल्याबाबत

**(३१) ११३५८४ (१२-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा आणि परिसरात राहणाऱ्या गोरगरीब रुग्णांवर मोफत औषधोपचार करता यावेत या उद्देशाने पंधरा वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले राजीव गांधी रुग्णालय चालविण्यासाठी डी. वाय. पाटील महाविद्यालयाबरोबर करार करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खारे आहे काय,

(२) असल्यास, डी.वाय.पाटील संस्थेतील सुमारे १५० कामगारांना बनावट रुग्ण म्हणून हातांवर बँडेज लावून उपचार सुरू असल्याचे भासविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय येरवडा, व डॉ.डी.वाय. पाटील डेंटल स्कुल, चऱ्होली बु. यांच्यामध्ये मेडिकल ट्रेनिंग व इतर पॅरामेडिकल कोर्सेससाठी ५ वर्षाच्या कालावधीकरिता दि. ६/३/२०१२ मध्ये करारनामा झालेला आहे.

या कराराची मुदत संपल्यानंतर दि. १४/९/२०१७ रोजी पुन्हा करारनामा करण्यात आलेला आहे. तथापि सदर करारनाम्यातील बाबींची पूर्तता करण्यापूर्वीच सदर संस्थेने रुग्णांना दाखल करुन घेतले होते. तसेच संस्थेमार्फत उपचार सुरु करण्यात आले होते.

या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर करारनाम्यातील अटींची पूर्तता करण्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत लेखी ताकीद दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मुंबई महानगरपालिकेतील मागील दहा वर्षांच्या कामांची महालेखापालामार्फत चौकशी करण्याबाबत**

**(३२) ११४२८३ (१८-०४-२०१८). अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेतील मगील दहा वर्षांच्या कामांची कॅगमार्फत चौकशी करून रस्त्यापासून खड्ड्यापर्यंत आणि नाल्यापासून कचऱ्यापर्यंत झालेला गैरव्यवहार निदर्शनास आणण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधी, जागरूक नागरिक, विविध सामाजिक व नागरी संघटनांच्या पदाधिकारी यांनी मा. मुख्यमंत्री, राज्यमंत्री (नगरविकास) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका ही भ्रष्टाचारामुळे आर्थिकदृष्ट्या डबघाईला येऊन नवीन अर्थसंकल्पात विकासकामांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेत सुरू असलेल्या विविध पदांच्या ऑनलाइन नोकरभरतीमध्ये सुद्धा निवड होणेसाठी उमेदवारांकडून दलालांमार्फत प्रत्येकी रु २ लाख लाच मागितली जात आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशीअंती कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अशा प्रकारची मागणी लेखी निवेदनाद्वारे प्राप्त झाले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेत विविध पदांसाठी सुरु असलेली ऑनलाईन भरती प्रक्रिया ही पारदर्शक पध्दतीने व यशस्वीरित्या पार पाडण्यात आली असून, सदर भरती प्रक्रियेत दलालांमार्फत कोणत्याही उमेदवाराकडून लाच मागितल्याबाबतची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईस्थित लोअर परेल येथील झालेल्या दुर्घटनेनंतर महानगरपालिकेकडून करण्यात येत असलेल्या कारवाईत अधिकृत हॉटेल चालकांना त्रास होत असल्याबाबत**

**(३३) ११४६०३ (१२-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईस्थित लोअर परेल येथील झालेल्या दुर्घटनेनंतर महानगरपालिकेकडून करण्यात येत असलेल्या कारवाईत अधिकृत हॉटेल चालकांना प्रशासनामार्फत त्रास देण्यात येत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) व (२) लोअर परेल सारख्या दुर्घटना भविष्यात उद्भवू नये या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृतपणे चालविणाऱ्या हॉटेल व उपहारगृहांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईदरम्यान अधिकृत हॉटेल चालकांना महानगरपालिकेमार्फत कोणताही त्रास देण्यात आला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेने माहिती अधिकार कार्यकर्त्यांना काळ्या यादीत टाकल्याबाबत**

**(३४) ११४७१३ (१२-०४-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रजा फौंडेशन या संघटनेला बहिष्कृत केले असून आणखी सुमारे ७० माहिती अधिकार कार्यकर्त्यांची काळी यादी बनविण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेची ही कृती अवैध असून त्यामुळे माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रजा फौंडेशनवरील बंदी मागे घेऊन महानगरपालिकेच्या कारभाराची माहिती सर्वसामान्यांना अधिक सुकरपणे उपलब्ध होण्यासाठी शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) प्रजा फाऊंडेशन यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिमेस इजा पोहोचविण्याचा प्रयत्न केला असल्याने, सदर संस्थेस तसेच त्या संघटनेतील कर्मचाऱ्यांना व प्रतिनिधी यांना “अस्विकार्य व्यक्ती” (Persona Non-grata) म्हणून जाहीर करण्याचे आदेश महानगरपालिकेमार्फत दिनांक २१.१०.२०१७ रोजी देण्यात आले आहेत.

तथापि महानगरपालिकेमार्फत इतर कोणत्याही माहिती अधिकारी कार्यकर्त्यांची काळी यादी बनविण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांशी संबंधित माहिती जनतेस उपलब्ध करुन देण्याकरिता, उपलब्ध असलेली संबंधित माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेत स्थळावर प्रसारीत करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या सर्व विभागांस देण्यात आले आहेत.

---

**भायखळा विभागातील सर्व्हे क्र.१४८२(पार्ट) या भूखंडाचा विकास करण्यासाठी मे.अतुल ॲण्ड आर्केड असोसिएट आणि मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये झालेला करार**

**(३५) ११५३२९ (१२-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा विभागातील सर्व्हे क्र.१४८२(पार्ट) या भूखंडाचा विकास करण्यासाठी मे.अतुल ॲण्ड आर्केड असोसिएट आणि मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये दिनांक ५ जून, २०१२ रोजी वा त्या सुमारास एक सविस्तर करार झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू करारानुसार विकासकाने मुंबई महानगरपालिकेला पाच टक्के सुविधा क्षेत्र (७०२.२९चौमी) मोफत हस्तांतरीत करणे आणि त्या सुविधा क्षेत्राकडे जाणारा ६ मीटर

रूंदीचा रस्ता बांधून देण्याची अट विकासकावर घालण्यात आली असतानाही आजमितीस सदरहू करारानुषंगाने सुविधा क्षेत्राकडे जाणारा ६ मीटर रूंदीचा रस्ता अद्यापपर्यंत मोफत हस्तांतरीत केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.अतुल ॲण्ड आर्केड असोसिएट यांनी मुंबई महानगरपालिकेबरोबर केलेल्या कराराचे उल्लंघन झाल्याने या प्रकरणी संबंधित विकासकांविरोधात विनाविलंब कारवाई करण्यात यावी अशा आशयांच्या मागणीचे एक निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.लोकप्रतिनिधी यांनी सुपूर्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि विकासक यांच्यामध्ये ५% सुविधा क्षेत्र हस्तांतरीत करुन घेण्याच्या दिनांक ०५.०३.२०१४ रोजीच्या ताबा पावतीनुसार ५% सुविधा क्षेत्राकडे जाणाऱ्या ६ मीटर वहिवाटीच्या रस्त्याविषयी दिनांक ०४.०८.२०१२ अन्वये करार झाला आहे.

(२) सदर प्रकरणी ६ मीटर वहिवाटीचा रस्ता विकासकाने सुविधा क्षेत्राकडे जाण्यासाठी उपलब्ध करणे व विक्री करारनाम्यात तशी नोंद करणे याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने वास्तुविशारदाला दिनांक ०२.०३.२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच आराखडयात दर्शविल्यानुसार माझगांव रोड (शिवदास चापसी मार्ग) येथील मुख्य प्रवेशद्वारापासून ५% सुविधा क्षेत्राकडे जात असल्याचे दर्शविण्यात आले आहे.

(३) भायखळा विभाग सर्व्हे क्रमांक १४८२ येथील ५% सुविधा क्षेत्राकडे जाणारा ६ मीटर रुंदीचा स्वतंत्र रस्ता ठेवण्याबाबत महानगरपालिकेमार्फत विकासकास दिनांक ०६.०८.२०१६ व दिनांक ०३.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच, सदर सुविधा भूखंडास स्वतंत्र मार्ग व सुविधा भूखंडाची मालकी महानगरपालिकेच्या नावे करीत नाही तोपर्यंत विकासकास पुढील कोणतीही विकास परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येऊ नये असे महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) व कार्यकारी अभियंता (विकास नियोजन) शहर यांना कळविण्यात आले आहे.

तथापि, ५% सुविधा क्षेत्राच्या स्वतंत्र प्रवेशद्वारापासूनर ते विकासकाने विकसित केलेल्या इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत ६ मीटर रुंदीच्या सामाईक/सार्वजनिक रस्त्याचे सिमांकन बृहन्मुंबई महानगरपालिकेने केले आहे. तसेच, सुविधा भूखंडाकडे जाणारा सार्वजनिक रस्ता असा फलक लावण्यात आला आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## सार्वजनिक ठिकाणे, उद्याने, मैदाने व मोकळया भूखंडावर धार्मिक किंवा अन्य कार्यक्रमांना परवानगी न देण्याचे महानगरपालिकेचे धोरण असल्याबाबत

**(३६) ११५३८६ (१२-०४-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक ठिकाणे, उद्याने, मैदाने व मोकळया भूखंडावर धार्मिक किंवा अन्य कार्यक्रमांना परवानगी न देण्याचे धोरण पालिका आयुक्तांनी आखले असतानाही महानगरपालिकेच्या डी विभाग कार्यालयाच्या हद्दीतील टोपीवाला लेन (ग्रँट रोड) महानगरपालिकेच्या शाळेचा मोकळा भूखंड व लगतच्या मैदानामध्ये दिनांक १५ ते २१ जानेवारी मध्ये वा त्या दरम्यान धार्मिक कार्यक्रमासाठी आयोजकांना परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डी विभाग कार्यालयातील वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी तेथील धार्मिक कार्यक्रमास अटीसापेक्ष परवानगी दिली तसेच अग्निशमन दलानेही 'ना हरकत' प्रमाणपत्र दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून दिलेल्या परवानगीमध्ये तेथे अन्न शिजविण्यास मनाई करण्यात आली आहे, मंडप स्थानकावरून सुखरूपपणे बाहेर पाडण्यासाठी स्वतंत्र मार्गिका असावी अशीही अट घालण्यात आली असतानाही या सर्व अटींकडे दुर्लक्ष करुन तेथे अन्न शिजवण्यात आले इतकेच नव्हेतर टोपीवाला लेनमध्ये दाटीदाटीने इमारती उभ्या असून शाळा भूखंडावर अन्न शिजवताना एखादी दुर्घटना घडल्यास कमला मिलसारख्या दुसऱ्या अग्नितांडवाची घटना घडू शकेल अशी भिती येथील नागरीकांकडून व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) सदर ठिकाणी दिनांक ०३.०१.२०१८ ते दिनांक २६.०१.२०१८ या कालावधीमध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत "बेटी बचाव बेटी पढाव" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमात वेगवेगळया सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

(२) सदर कार्यक्रम सर्व शिक्षा अभियानांतर्गत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत फक्त या कार्यक्रमास परवानगी देण्यात आली होती.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) संबंधित संस्थेने ज्या कारणासाठी परवानगी घेतली होती तो कार्यक्रम न करता नियमबाह्यरितीने धार्मिक कार्यक्रम करीत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यावर, सदर कार्यक्रम त्वरीत बंद करण्यात आला.

सदर ठिकाणी अन्न शिजवित असल्याचे आढळून आल्याने ३ गॅस सिलेंडर्स जप्त करण्याची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

---

## दक्षिण मुंबईतील गिरगाव खाडीलकर रोड येथील सदाशिव लेन व्होरा इमारतीच्या पुनर्विकासाबाबत

**(३७) ११५३८७ (१२-०४-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील गिरगाव खाडीलकर रोड येथील सदाशिव लेन व्होरा इमारतीच्या पुनर्विकासाचे काम थांबविण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांनी दिलेले असताना या इमारतीच्या पुनर्विकासाचे काम सुरूच असून महानगरपालिकेच्या डी विभाग कार्यालयातील संबंधित अधिकारी विकासक व ठेकेदाराला संरक्षण देत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्होरा इमारतीच्या पुनर्विकासाचे काम सुरू असताना, दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी येथील कानजी खेतशी चाळ व्होरा इमारतींवर कोसळलेल्या दुर्घटनेत १ व्यक्तिचा मृत्यू व ३ जण गंभीररित्या जखमी झालेत तसेच तद्नंतर काम सुरू असताना अचानक लोखंडी सुरक्षा परात कोसळून गाडयाचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने या दोन्हीही घटनांची गंभीर दखल घेत महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांनी विकासक व ठेकेदाराच्या हलगर्जीपणाबाबत दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास नोटिस बजावत अटी व शर्तीची पूर्तता केल्याशिवाय कोणतेही काम न करण्याचे आदेशही देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, विकासकाने व्होरा इमारतीचे काम नियुक्त केलेल्या स्ट्रक्चरल इंजिनियर व सुरक्षा अधिकारी यांच्याकडून पडताळणी केल्याशिवाय चालू करण्यात येऊ नये सुरक्षितता व सावधगिरीच्या सर्व उपाययोजनाचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतही सदरहू आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, व्होरा इमारतीच्या पुनर्विकासाचे सुरू असलेल्या कामाबाबत डी विभाग महानगरपालिकेकडे नागरीकांनी सातत्याने तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या व विकासकाला पाठिशी घालणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यावर त्वरीत कारवाई करण्याची मागणी करणारे एक निवेदन आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) सदर इमारतीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाच्या परवानगीने सुरु असून, महानगरपालिकेच्या डी विभाग कार्यालयातील संबंधित अधिकारी हे विकासकाला व ठेकेदाराला संरक्षण देतात ही बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर इमारतीच्या कामासंदर्भात सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्याशिवाय काम करण्यात येऊ नये असे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांनी दिनांक १६.०९.२०१७ रोजी दिले आहे.

(४) व्होरा इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासंदर्भात नागरिकांचे निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(५) सदर प्रकरणी व्होरा इमारतीचे वास्तुविशारद यांनी स्ट्रक्चरल इंजिनिअर व सुरक्षा अधिकारी यांचेकडून सदर इमारतीचे संरचनात्मक तसेच सुरक्षितता व सावधगिरीच्या सर्व उपाययोजना केल्याबाबत अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करण्यात आला असून, उर्वरित काम सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेमार्फत शहरात सायकल ट्रॅकसाठी ३२० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याबाबत**

**(३८) ११६०३० (१२-०४-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट आर्थिक संकटात असतानाही महानगरपालिकेमार्फत शहरात सायकल ट्रॅकसाठी ३२० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायकल ट्रॅकवर कोटयवधी रुपये खर्च करण्याऐवजी बेस्ट उपक्रम वाचविण्यासाठी खर्च करावा अशी विविध स्तरातून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी पुढे कोणता निर्णय घेतला आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) मुंबई शहरात सायकल ट्रॅकसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अंदाजित रु. ३२५.१६ कोटी खर्च असून, त्याअनुषंगाने सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिकेमार्फत रु. १०० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांनुसार महानगरपालिकेकडे अशा प्रकारचे मागणीवजा प्राप्त झाले नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांजूरमार्ग (प.) येथील हुमा मॉलमध्ये डेक्कन मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड व मॅकडोनल्ड यांच्या व्यवस्थापकांनी केलेले अवैध बांधकाम**

**(३९) ११६५७६ (२३-०५-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांजूरमार्ग (प.) येथील एलबीएस रोड,मुंबई येथील हुमा मॉलमध्ये डेक्कन मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक लि. व मॅकडोनल्डच्या व्यवस्थापकांनी अवैध बांधकाम सुरु केले असल्याबाबत मा. सहा.अभियंता (इमारत बांधकाम व कारखाने) एस विभाग यांना तसेच मा. सचिव, नगरविकास विभाग यांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित मॉल मालकांवर तसेच संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) कांजूरमार्ग (प.) येथील हुमा मॉलमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या स्थळ निरीक्षणात, सदर मॉलच्या तळमजला व पहिला मजला येथे विना परवाना अंतर्गत बदलाचे काम सुरु असल्याचे आढळून आले.

त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामास महानगरपालिकेमार्फत दिनांक ०९.०८.२०१७ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४-अ अन्वये काम थांबविण्याबाबत नोटीस बजावण्यात आली. तद्नंतर दिनांक १५.०१.२०१८ रोजी महानगरपालिकेमार्फत अंतर्गत भिंतीचे निष्कासन करण्यात आले.

तथापि पक्षकाराने सदर मॉलच्या तळमजला व पहिला मजला येथे अंतर्गत फेरबदलाच्या कामाचे नियमितीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला असून, त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**पुणे, शिवणे ते खराडी नदी काठचा रस्ता अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४०) ११६६४९ (२६-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, शिवणे ते खराडी नदी काठचा रस्ता सात वर्ष उलटून गेली तरी अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखड्यात शिवणे ते खराडी हा नदीकाठचा रस्ता आरक्षित करण्यात आला होता या रस्त्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले असतांना मात्र गत सात वर्षात भूसंपादनाअभावी हा रस्ता अपूर्णवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याचे काम रखडलेले असून त्यामुळे या रस्त्याच्या कामाला तब्बल तीनवेळा मुदतवाढ देण्याची नामुष्की महानगरपालिकेवर ओढावली असून परिणामी या रस्त्याच्या खर्चात कोट्यवधींनी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • सदर रस्त्याचे काम दि. २०/५/२०११ पासून चालू आहे.
• विकास योजना आराखड्यातील रस्ता रुंदीतील जागा संबंधित जमिन मालकाकडून घेऊन टप्प्याटप्प्याने विकसीत करण्यात येत असून रस्ता रुंदीतील जागेच्या उपलब्धते अभावी सदरचे काम प्रलंबित आहे.
• या रस्त्याच्या कामात तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे, ही वस्तुस्थीती आहे. सदर कामाच्या एकूण १७.५० कि.मी. लांबीपैकी आज अखेर ८.६२ कि.मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत काम भूसंपादना अभावी प्रलंबीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे मार्केट यार्डाजवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरामधील झोपडपट्टीला आग लागल्याबाबत**

**(४१) ११९५६४ (२९-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे मार्केट यार्डाजवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमध्ये असलेल्या झोपडपट्टीला दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून झोपडपट्टीतील घरांमधील रोख रक्कम आणि मालमत्ता जळून खाक झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपडपट्टीला लागलेल्या आगीत किती जिवित व मालमत्तेची हानी झाली आहे,
(३) असल्यास, सदर झोपडपट्टीला आग लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) पुणे शहरातील मार्केटयार्ड जवळील आंबेडकरनगर झोपडपट्टीला दिनांक २१.४.२०१८ रोजी भीषण आग लागून त्यामध्ये ७४ कुटुंबीयांच्या झोपड्या जळाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सदर आगीमध्ये कोणत्याही प्रकारची जीवीतहाणी झाली नसून अंदाजे ५० लक्ष रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

(३) सदर झोपडपट्टीतील घरांमध्ये इलेक्ट्रीक वायरींग शॉट सर्किट झाल्यामुळे, घरांमध्ये स्टोव्ह भडका झाल्याने, ज्वलनशील पदार्थाना आग लागल्याने वारंवार अशा घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. या झोपडीधारकांना तात्पुरत्या निवासाची सुविधा देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहर परिसरात ४०० हून अधिक बेकायदा रुफ टॉप हॉटेल सुरु असल्याबाबत**

**(४२) १२०३८९ (२९-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर परिसरात ४०० हून अधिक बेकायदा रुफ टॉप (टेरेस) हॉटेल फायर ब्रिगेडची ना हरकत परवानगीशिवाय सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महानगरपालिका प्रशासन बेकायदा हॉटेलवर कारवाई करण्यास विलंब करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हॉटेल्सला परवानगी देण्याचे पोलिसांचे अधिकार काढण्यात आले असून केवळ २०० रुपये दंडाची कायद्यात तरतूद असल्याने बेकायदा हॉटेल व्यावसायिकांवर पोलीस कारवाई होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार बेकायदा रुफ टॉप हॉटेल व्यावसायिकांवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) व (२) • बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार टेरेसवर रेस्टॉरंट/उपहारगृह वापर अनुज्ञेय नाही. पुणे महानगरपालिकेमार्फत रुफ टॉप (टेरेस) हॉटेल्ससाठी परवानगी दिली जात नाही. त्यामुळे असा वापर अनधिकृत आहे.
• महानगरपालिकेने केलेल्या पाहणीत महानगरपालिका हद्दीत रुफ टॉप वर ४२ हॉटेल्स अनधिकृतरित्या सुरु असल्याचे निदर्शनास आले.
• या सर्व हॉटेल्सला नोटीसा देण्यात आल्या. त्यापैकी ३६ मिळकतीतील अनधिकृत रुफ टॉप हॉटेल्सवर कारवाई करण्यात आली व १३१०३२ चौ.फु. इतके बांधकाम निष्कासित करण्यात आले.
• या व्यतिरिक्त एकूण ६ रुफ टॉप टेरेस हॉटेल धारकांना कोर्टाकडून स्थगिती आदेश देण्यात आले असून स्थगिती आदेश उठविण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. स्थगिती आदेश उठविल्यानंतर पुढील आवश्यकती कार्यवाही करण्यात येईल.
(३) बेकायदेशीर हॉटेल्स संदर्भात कारवाईची मुख्य जाबाबदारी संबंधीत नागरी स्थानिक संस्थेची आहे. तसेच अधिनियमातील प्रचलित तरतूदीनुसार पोलीसांमार्फत देखील कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर शहरातील शिवशंकर होडा कपंनीकडून एल.बी.टी च्या नावाने ग्राहकांची व महानगरपालिकेची फसवणूक झाल्याबाबत**

**(४३) १२२०९० (३०-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील शिवशंकर होडा कपंनीकडून सन २०१२ ते २०१७ या कालावधी एल.बी.टी च्या नावाने ग्राहकांकडून ३ टक्के रक्कम वसुल करून ग्राहकांची व महानगरपालिकेची फसवणूक केल्याची बाब दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार उक्त होडा कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) नाही हे खरे नाही. तथापि, अशा आशयाची तक्रार चंद्रपूर महानगरपालिकेस दिनांक २६.०४.२०१८ रोजी प्राप्त झाली होती.

(२) • चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात दि.०१.११.२०१२ पासून स्थानिक संस्था कर लागू झाला. त्यानुसार दि. ०१.११.२०१२ ते दि.१०.०९.२०१३ या कालावधीत दोन चाकी वाहनांवर स्थानिक संस्था कराचा दर ३ टक्के इतका होता.

• त्यानंतर दि.१.०९.२०१३ ते ३०.०६.२०१७ या कालावधीत दोन चाकी वाहनावरील स्थानिक संस्था कराचा विहीत दर दोन टक्के इतका होता.

• चंद्रपूर शहरातील शिवशंकर होंडा कंपनीने वरील विहीत दरानेच सदर कराची ग्राहकांकडून वसुली व विहित दरानेच महापालिकेकडे भरणा केला असून, ग्राहकांची फसवणूक केली नसल्याचे महानगरपालिकेच्या अहवालात नमुद आहे.

• तथापि, चंद्रपूर शहरातील शिवशंकर होंडा कंपनीने फसवणूक केल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने शिवशंकर होंडा कंपनीचे लेखे मनापने नियुक्त केलेल्या सनदी लेखापालाकडून तपासले असता, कंपनीकडून रु.१६,७७,५३८/- एवढे अतिरीक्त दायित्व निघते. त्याच्या वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील विद्युत खांबावर टाकण्यात आलेल्या अनधिकृत केबलबाबत**

**(४४) १२३१०५ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीमधील विद्युत खांबावर केबलधारकांकडुन अवैधरित्या केबल टाकण्यात येत असल्याने मोठया अपघाताला सामोरे जावे लागण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशानाकडे सन २०१३ पासून वारंवार पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिका प्रशासनातील काही अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने उक्त दोंषीवर शासनाकडुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१)कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील विद्युत खांबावर केबलधारकांकडून अवैधरित्या केबल टाकण्यात येतात, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात जमिनी खालून जाणाऱ्या केबल्स टाकण्याकरिता विविध कंपन्या/संस्था यांचेकडून रस्ता खोदाईपोटी विहित शुल्क आकारून महानगरपालिकेकडून परवानगी दिली जाते. तथापि, उन्नत केबल्स टाकणेकरिता अशा प्रकारची परवानगी महानगरपालिकेकडून घेण्यात येत नाही.

•महानगरपालिकेच्या विद्युत पोलचा आधार घेऊन टाकण्यात आलेल्या केबल्सवर महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागामार्फत नियमित कार्यवाही करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

•कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील भुमिगत व उन्नत केबलवर भाडे आकारणी करणे व त्याअनुषंगाने मालमत्ता कराची आकारणी करणे याकरिता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि.०५.१२.२०१७ रोजी ठराव क्र.६५ पारीत केलेला आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत भुमिगत व उन्नत केबल वापरकर्त्या संस्था/कंपन्या यांचेकडून माहिती संकलनाचे काम कर निर्धारक व संकलक विभागामार्फत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेत टँकरने होणाऱ्या पाणीपुरवठ्यात झालेला गैरव्यवहार**

**(४५) १२३४१५ (३०-०७-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील ज्या भागात नळाने पाणीपुरवठा केला जात नाही त्या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे टँकर पाठविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने कोणतीही निविदा न काढता शेख कंन्स्ट्रक्शन या एजन्सीला काम दिले व कोणतीही मान्यता न घेता रुपये १ कोटी ७४ लाखांचे देयके अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाण्याच्या टँकरसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी ५ हजार लिटरच्या टँकरसाठी १४६० रु. व १० हजार लिटरच्या टँकरसाठी २५६० रु. दर निश्चित केला असतांना महानगरपालिकेने मात्र यासाठी अनुक्रमे १७९५ रुपये व ३१३० रु. हा वाढीव दर दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत ज्या भागात नळाने पाणी पुरवठा केला जात नाही, अशा भागात सशुल्क ड्रम पध्दतीने टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो, ही वस्तुस्थिती आहे.

(२) महानगरपालिकेमधील सातारा-देवळाई या भागाकरिता पाणीपुरवठा करण्याबाबत सर्वसाधारण सभेची मान्यता घेवुन निविदा काढण्यात आलेली होती. सातव्या वेळेच्या निविदेस स्थायी समितीची मान्यता घेवुन मे.शेख कन्स्ट्रक्शन्स औरंगाबाद यांना दि.७.१०.२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आले. सदर कामाकरिता रु. ७६,४८,८३५ /- इतका खर्च झालेला आहे.

(३) सातारा देवळाई परिसरासाठी विहित पध्दतीचा अवलंब करून ई-निविदा प्रक्रियेद्वारे अंतिम केलेल्या खालील दराने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

अ) ५ हजार लिटर टँकरसाठी :-रू.१४५०/-

ब)१० हजार लिटर टँकरसाठी:-रू.२६७०/-

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांमधील मुलांच्या संख्येत मोठया प्रमाणात घट झाल्याबाबत

**(४६) १२४८४१ (३०-०७-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांमधील मुलांच्या संख्येत मोठया प्रमाणात घट होत असल्याचे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मराठी शाळांमधील मुलांची संख्या वाढीच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) नागरी क्षेत्रामध्ये पालकांचा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये टाकण्याचा मोठ्या प्रमाणात वाढलेला कल पहाता, मराठी माध्यमाच्या शाळांमधील पटसंख्या कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

(२) व (३) महानगरपालिकेच्या मराठी शाळांमधील मुलांची संख्या वाढावी यासाठी, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक, इतर शैक्षणिक साहित्य वाटप करणे तसेच लांब अंतरावरील विद्यार्थ्यांकरिता मोफत बस सुविधा, सायकल बँक योजनेअंतर्गत सायकल उपलब्ध करुन देणे, यासाठी शिक्षकांच्या कार्यशाळेचे आयोजन करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

---

### चंद्रपूर शहराला पाणीपुरवठा करणा-या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत

**(४७) १२५१३१ (२५-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहराला पाणीपुरवठा करणा-या कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या प्रलंबित असल्यामुळे त्यांनी दिनांक २ मे, २०१८ पासून संपावर जाण्याचा निर्णय घेतला असून चंद्रपूर शहराचे पाणी बंद होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याअभावी शहरामध्ये अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • चंद्रपूर शहराला पाणीपुरवठा करीत असलेल्या खाजगी कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांनी ०२ मे २०१८ पासून संपावर जाण्याबाबत इशारा दिला होता. ही बाब खरी होती.

• तथापि, त्यांच्या मागण्यासंदर्भात चर्चा करुन त्यांना संपावर न जाण्यापासून परावृत्त केल्यामुळे असा संप झालेला नाही.

• परिणामी चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम झालेला नाही.

---

### पुणे जिल्ह्यात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत झालेली वाढ

**(४८) १२५२०४ (३०-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पोलीस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने चावा घेवून जखमी केल्याची घटना दिनांक ३१ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली तसेच

भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात पिंपरी चिंचवड जवळील माण येथील ५ वर्षांच्या कु.साहिल अन्सारी या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना माहे मार्च, २०१८ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लहान मुले, महिला, वृध्द यांच्या जीवाला धोका निर्माण होत असून अशा भटक्या कुत्र्यांची पुणे जिल्ह्यातील वाढलेली संख्या पाहता त्यांच्यावर तत्काळ योग्य ती कारवाई करण्यात येत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भटक्या कुत्र्यांच्या वाढलेल्या हल्ल्यामुळे मृत्यू पावल्यांच्या तसेच जखमी झाल्याच्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती निर्णयात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्याबाबत अद्याप उपाययोजना करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने पुणे मनपा हद्दीतील पोलिस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना चावा घेवून जखमी करण्याची घटना दिनांक ३१ मे, २०१८ रोजी घडली आहे हे खरे आहे.
• भटक्या कुत्र्यांच्या वाढलेल्या हल्ल्यामुळे नागरिक मृत पावणे तसेच जखमी झाल्याच्या घटना रोखण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या दोन डॉग पॉन्ड असून त्यामध्ये भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्याची कार्यवाही निविदा प्रक्रिया द्वारे आलेल्या खाजगी संस्थामार्फत करण्यात येत आहे. भटक्या व मोकाट कुत्र्यांना पकडण्यासाठी मनपाची व खाजगी संस्थाची वाहने उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेने शासन परिपत्रकाचे उल्लंघन करुन मलवाहिकेचे कंत्राट अभी इंजिनियरिंग कार्पोरेशन प्रा.लि.ला दिल्याबाबत**

**(४९) १२६३०८ (३०-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेने दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकाचे उल्लंघन करून अभी इंजीनियरिंग कार्पोरेशन प्रा.ली कंपनीला नागपूर दक्षिण मतदार क्षेत्रांतर्गत हिंगणघाटी पोइंट ते नागोबा मंदिर चौक पर्यंत मलवाहिकेचे तसेच दक्षिण पश्चिम मतदार क्षेत्रांतर्गत हिंगणघाटी पोइंट ते सहकार नगर घाट येथे पावसाळी वाहिकेच्या बांधकामाचे करार केले आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकात दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ पूर्वी ज्या निविदा स्वीकृत करण्यात आल्या पण कार्य आदेश देण्यात आलेले नाही अशा सर्व निविदा रद्द कराव्यात व GST करामुळे कमी झालेल्या किंमती प्रमाणे नवीन निविदा

काढाव्यात असे आदेश असतानाही अभी इंजिनियरिंग कार्पोरेशन प्रा.ली.कंपनीला अशा प्रकारची सवलत देण्याची करणे काय आहेत,
(३) असल्यास, त्यामुळे शासनावर अतिरिक्त भर पडणार असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाचे परिपत्रकाचे उल्लंघन करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८)** :(१) विहित तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनंतर तसेच विहित निविदा प्रक्रिया पूर्ण करुन हिंगणघाटी पॉईंट ते नागोबा मंदिर या मलवाहिकेच्या कामाचे तसेच हिंगणघाटी पाँईंट ते सहकार नगर या पर्जन्य जलवाहिनीच्या कामाचे कार्यादेश आदेश दिनांक ३१/०८/२०१७ रोजी नागपूर महानगरपालिकेने दिले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) या निविदेतील करारानुसार कंत्राटदार GST कराचा बोझा स्वत: वहन करणार असल्याने, तसेच GST मुळे फायदा झाल्यास तो संपूर्ण फायदा नागपूर महानगरपालिकेला वळती करण्यात येईल अशा प्रकारची लेखी हमी कंत्राटदाराने दिनांक १२/०६/२०१८ रोजी दिलेली आहे. त्यामुळे या प्रकरणी वित्तीय हानी झालेली नाही, असे नागपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावातील आरक्षित भूखंडाबाबत**

**(५०) १२६३३५ (०३-०८-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावातील शासनाने मंजुर केलेल्या कृती आरखडयानुसार असलेली आरक्षणे बाधित होवु नये या करिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार सुचना व पत्रव्यवहार करूनही सदर आरक्षीत भुखंडावर अतिक्रमण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरक्षणे वाचविण्याकरिता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर आरक्षाणावर अतिक्रमण होण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकांऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८)** : (१), (२) व (३) • २७ गावांच्या क्षेत्रासाठी शासनाने मंजूर केलेल्या विकास योजनेतील सेक्टर १ ते ४ मध्ये एकूण ५०५ आरक्षणे आहेत.

• २७ गावांमधील विकास योजनेतील रस्ते व आरक्षणांचा विकास पूर्ण क्षमतेने करून विकास योजनेची अंमलबजावणी होणेकामी तसेच रस्ते व आरक्षणांचे क्षेत्रावर अनधिकृत बांधकामे न होणेस्तव नियंत्रण ठेवण्यासाठी सदर विकास योजनेतील रस्ते व आरक्षणांच्या क्षेत्राचे सविस्तर सर्व्हेक्षण व Demarcation करणेकरिता खाजगी संस्थेची नेमणूक करणेकरिता निविदा मागविण्यात आलेल्या असून, सदर निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेमार्फत दैनंदिन कारवाई कण्यात येत असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम-२६० व १६७(१) अन्वये नोटीस देऊन, सदरचे बांधकाम सुनावणीअंती अनधिकृत म्हणून घोषित करण्यात येतात.

• अनधिकृत बांधकामाविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलमांन्वये एकूण ५९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर प्रचलित अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.